**प्रेसनोट दि.०८/०३/२०१९**

**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे**

दि.०७/०३/२०१८ रोजी रात्रौ २०/०० ते २०/४५ वा. चे दरम्यान चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक गुन्हे, श्रीमती वैशाली गलांडे यांनी शिवाजीराव भोसले रिक्षा स्टँन्ड भोसलेनगर पुणे येथे रिक्षा युनियनचे पदाधिकारी व रिक्षा चालक यांची बैठक घेवुन रिक्षा चालकांनी अवैध प्रवासी वाहतुक करु नये, तसेच वाहतुकीचे नियम पाळणे बाबत रात्रीचे वेळी प्रवाशाकडुन अधिकचे भाडे घेवु नये तसेच रिक्षात प्रवाशांची बॅग अगर वस्तु राहील्यास त्या जवळच्या पोलीस स्टेशनला जमा करणे बाबतच्या जरुर त्या सुचना दिल्या आहेत. त्यामुळे रिक्षा युनियनचे पदाधिकारी व रिक्षा चालकांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.